


सायं दैनिक
# नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

• वर्ष २५ वे • अंक ६ • बुधवार दि.२३ सप्टेंबर २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ • पाने ४ • किंमत १ रु.

## शेतकऱ्यांना सरसकट नुकसान भरपाई-मुख्यमंत्री फडणवीस

### २ दिवसात दुष्काळ जाहीर करु;लातुरमध्ये शेतकऱ्याला अश्रू अनावर



लातूर: राज्यातील दुष्काळसदृश परिस्थितीची गंभीर दखल घेत येत्या दोन दिवसांत दुष्काळ जाहीर करण्यात येईल, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी लातूर जिल्ह्यातील नुकसानग्रस्त भागाच्या पाहणीदरम्यान केली. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना सरसकट नुकसानभरपाई देण्यात येईल, असे आश्वासनही त्यांनी यावेळी दिले. त्यामुळे पावसाअभावी उद्ध्वस्त झालेल्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे. दरम्यान मुख्यमंत्र्यांना नुकसानीची माहिती देतांना शेतकऱ्याला आश्रु अनावर झाले. त्यावेळी मुख्यमंत्र्यांनी त्याला जवळ घेवून धीर दिला.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी औसा मतदारसंघातील खरोसा शिवारात जाऊन नुकसानग्रस्त शेतीची प्रत्यक्ष पाहणी केली. सोयाबीनसह खरीप पिकांची झालेली दुरवस्था त्यांनी बांधावर जाऊन पाहिली. पावसाने दडी मारल्याने पिके करपली असून शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेल्याचे चित्र या भागात आहे. शेतकऱ्यांनी मुख्यमंत्र्यांसमोर आपल्या अडचणी मांडताना मदतीची मागणी केली. यावेळी एका शेतकऱ्याला आपली व्यथा सांगताना अश्रू अनावर झाले. तो ढसाढसा रडत मुख्यमंत्र्यांसमोर आला. त्याची व्यथा ऐकल्यानंतर फडणवीस यांनी त्याला मिठीत घेत धीर दिला. संकटाच्या काळात तुम्ही एकटे नाही, आम्ही तुमच्या सोबत आहोत, असा विश्वास त्यांनी शेतकऱ्यांना दिला.

पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना सरसकट मदत देण्याचे आश्वासन मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले. नुकसान निश्चित करण्यासाठी पंचनामे करण्याची प्रक्रिया सुरू असली तरी मदत देताना शेतकऱ्यांना दिलासा देण्याचा शासनाचा प्रयत्न राहील, असे त्यांनी स्पष्ट केले. पावसाअभावी निर्माण झालेल्या परिस्थितीत शेतकऱ्यांना आर्थिक मदतीसोबतच आवश्यक त्या मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील, असेही त्यांनी सांगितले. लातूर जिल्ह्यात यंदा पावसाचे प्रमाण अत्यल्प राहिल्याने दुष्काळाची परिस्थिती निर्माण **पान ४ वर**

## मानहानी खटल्यात उद्धव ठाकरे,शिंदेंसह चौघे निर्दोष

कल्याण : शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, आनंद परांजपे आणि रमाकांत देवळेकर या चौघांची वसंत डावखरे मानहाणी प्रकरणातून कल्याण न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली आहे. न्यायाधीश संतोष आगे यांनी हा निकाल दिला. राज्याच्या राजकीय वर्तुळाचे लक्ष लागून राहिलेल्या दिवंगत नेते वसंत डावखरे मानहानी खटल्याचा तब्बल १७ वर्षांनंतर बुधवारी अंतिम निकाल लागला.

२००९ च्या लोकसभा निवडणुकीदरम्यान कल्याण पूर्वेतील कोळसेवाडी परिसरात झालेल्या शिवसेनेच्या प्रचारसभेत तत्कालीन राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार वसंत डावखरे यांच्याशी संबंधित एक चित्रफीत दाखवण्यात आली होती. या चित्रफितीत डावखरे हे कार्यकर्त्यांना निवडणूक जिंकण्यासाठी पोलिस आणि निवडणूक अधिकाऱ्यांची भीती न बाळगता प्रयत्न करण्याचे आवाहन करत असल्याचे दाखवण्यात आले होते. तत्कालीन शिवसेना कार्याध्यक्ष उद्धव ठाकरे यांनी डोंबिवलीतील प्रचारसभेत ही चित्रफीत सार्वजनिकरीत्या दाखवल्याचा आरोप करण्यात आला होता. मात्र, चित्रफितीतील वक्तव्य आपले नसल्याचे डावखरे यांनी स्पष्ट केले होते. संबंधित चित्रफितीतील मजकूर निवडकपणे संपादित करून आपली बदनामी करण्यासाठी वापरण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला. त्यानंतर त्यांनी उद्धव ठाकरे, एकनाथ शिंदे, आनंद परांजपे आणि रमाकांत देवळेकर यांच्याविरोधात मानहानीचा खटला दाखल केला होता. या प्रकरणाची सुनावणी तब्बल १७ वर्षे कल्याण न्यायालयात सुरू होती.

## महाराष्ट्र विधानसभा निवडणूक रद्द करा-काँग्रेस,शिवसेनेची मागणी

मुंबई/प्रतिनिधी- मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या काही निर्णयांवर निवडणूक आयुक्त सुखबीरसिंग संधू आणि विवेक जोशी यांनी आक्षेप घेतल्याचे वृत्त समोर आल्यानंतर महाराष्ट्रासह इतर राज्यात नुकत्याच झालेल्या निवडणूका रद्द कराव्यात अशी मागणी काँग्रेस आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने केली आहे. विधानसभा निवडणूक प्रक्रियेबद्दल गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत.

निवडणूक आयोगाच्या अंतर्गत निर्णयप्रक्रियेवर प्रश्नचिन्हे उपस्थित करणाऱ्या एका इंग्रजी वृत्तपत्र वृत्तामुळे महाराष्ट्रातील राजकीय वातावरण तापले आहे. काँग्रेसकडून महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीच्या प्रक्रियेबाबत फेरविचार करण्याची आणि निवडणूक रद्द करून पुन्हा निवडणूक घेण्याची मागणी करण्यात आली आहे. निवडणूक आयोगाच्या कामकाजातील पारदर्शकता आणि मतदार यादीच्या प्रक्रियेबाबत विरोधकांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांची चौकशी करण्याची मागणीही करण्यात आली आहे.

काँग्रेसने दिल्लीत पत्रकार परिषद घेतल्यानंतर शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनीही मुंबईत घेतलेल्या पत्रकार परिषदेत निवडणूक आयोगाच्या निर्णयप्रक्रियेवर प्रश्न उपस्थित केले. निवडणूक आयोगातील दोन आयुक्तांनी काही निर्णयांवर आक्षेप घेतल्याचे वृत्त समोर आल्याबद्दल त्यांनी सुखबीरसिंग संधू आणि विवेक जोशी यांचे कौतुक केले.

निवडणूक आयुक्तांची नियुक्ती कोणाच्या मर्जीने होते? आयोगाच्या निर्णयप्रक्रियेत पारदर्शकता असली पाहिजे, असा सवाल ठाकरे यांनी उपस्थित केला.महाराष्ट्रातील विधानसभा निवडणूक रद्द करून नव्याने निवडणूक घेण्यात यावी, अशी मागणी उद्धव ठाकरे यांनी केली. तसेच आगामी निवडणुका बॅलेट पेपरवर घेण्याची मागणीही त्यांनी केली. निवडणूक प्रक्रियेवरील विश्वास कायम ठेवण्यासाठी सर्व राजकीय पक्षांनी या मुद्द्यावर एकत्र यावे, असे आवाहन त्यांनी केले. दरम्यान, महाराष्ट्रातील मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षणाच्या प्रारूप यादीत मोठ्या संख्येने मतदारांची नावे राहिल्याचे निवडणूक आयोगाच्या आकडेवारीवरून समोर आले आहे. ९ कोटी ७८ लाखांहून अधिक मतदारांपैकी सुमारे ७ कोटी ७१ लाख मतदार प्रारूप यादीत समाविष्ट झाले असून सुमारे २.०७ कोटी नावे प्रारूप यादीत राहिलेली नाहीत. मात्र, ही नावे अंतिमतः वगळण्यात आली आहेत, असे समजू नये, असे निवडणूक आयोगाने स्पष्ट केले आहे. संबंधित मतदारांना दावे-हरकती नोंदवण्याची संधी देण्यात आली **पान ४ वर**

### निवडणूक आयोगाचे स्पष्टीकरण

निवडणूक आयोगातील निर्णय एकमताने नव्हे, तर बहुमताने घेतले जातात. आयुक्तांमध्ये मतभेद होणे ही निर्णयप्रक्रियेचा सामान्य भाग असून, त्याला अंतर्गत वाद म्हणता येणार नाही, असे केंद्रीय निवडणूक आयोगाने स्पष्ट केले. लेखी नोंदी, परस्पर चर्चा आणि चेक अँड बॅलन्सची व्यवस्था ही आयोगाच्या नियमित कार्यपद्धतीचा भाग असल्याचेही आयोगाने सांगितले. आयोग ही भारतीय संविधानाच्या कलम अंतर्गत कार्य करणारी घटनात्मक संस्था असल्याचे प्रसिद्धीपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

### शिंदेसेना-जरांगेंत पुन्हा खडाजंगी

## ठाण्याला आव्हान देऊ नका-ना.गोगावले





मुंबई/प्रतिनिधी-एकनाथ शिंदे यांची शान लाखो लाडक्या बहिणी, मराठे आणि शेतकऱ्यांसाठी केलेल्या कामामुळे वाढली आहे. कोणी ऐऱ्यागैऱ्याने त्याचे श्रेय घेऊ नये आणि ठाण्याला कोणी आव्हान देऊ नये, असा इशारा राज्याचे मंत्री तथा शिंदेसेनेचे नेते भरत गोगावले यांनी मनोज जरांगे पाटील यांना दिला आहे.

आंदोलनाच्या काळात जरांगे पाटील यांनी सरकारवरही गंभीर आरोप केले होते. आपल्या विरोधात टीका करण्यासाठी ११ टीम तयार करण्यात आल्याचा दावा त्यांनी केला होता. त्यामुळे मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून सत्ताधारी आणि जरांगे पाटील यांच्यातील संघर्ष पुन्हा तीव्र होण्याची चिन्हे आहेत. मराठा आरक्षणासाठीचे उपोषण मागे घेतल्यानंतर मनोज जरांगे पाटील यांच्या वक्तव्यावरून सत्ताधारी आणि जरांगे यांच्यात पुन्हा आरोप-प्रत्यारोप सुरू झाले आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची शान गरीब मराठ्यांनी वाढवल्याचे वक्तव्य जरांगे यांनी केले होते. त्यावर मंत्री भरत गोगावले यांनी पलटवार केला.

## किनवट तालुक्यातील इस्लापूर येथे अपर तहसीलदार कार्यालय मंजूर

### नागरिकांना महसुली सेवा जलद मिळणार

(विशेष प्रतिनिधी)

किनवट:नांदेड जिल्ह्यातील किनवट तालुक्यातील इस्लापूर येथे नवीन अपर तहसीलदार कार्यालय स्थापन करण्यास आणि प्रत्यक्ष कार्यान्वित करण्यास महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाने अंतिम मान्यता दिली आहे. याबाबतचा शासन निर्णय २२ सप्टेंबर २०२६ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. या निर्णयामुळे इस्लापूर परिसरातील नागरिकांना महसुली कामांसाठी किनवटच्या मुख्य तहसील कार्यालयात जाण्याची गरज उरणार नसून, प्रशासकीय कामकाज अधिक गतीमान आणि लोकाभिमुख होण्यास मदत होणार आहे.

शासकीय कामाचा वाढता व्याप, भौगोलिक अंतर, वाढती लोकसंख्या आणि नागरीकरण विचारात घेऊन महसूल प्रशासनाचे बळकटीकरण करण्यासाठी शासनाने हा निर्णय घेतला आहे.

**कार्यालयांचे कार्यक्षेत्र व महसूल मंडळे:** अपर तहसीलदार कार्यालय, इस्लापूर: या नवीन कार्यालयांतर्गत इस्लापूर, जलधारा आणि शिवणी या ३ महसूल मंडळांचा समावेश असणार आहे. तहसीलदार कार्यालय, किनवट: मुख्य तहसील कार्यालयांतर्गत किनवट, बोधडी (बु.), दहेली, मांडवी, उमरी (बा.) आणि पसदगी (मो.) ही ६ महसूल मंडळे कायम राहतील.

**अधिकार आणि कामाचे स्वरूप:** नवीन अपर तहसीलदार कार्यालयाला 'महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६' अन्वये असणारे सर्व अधिकार व कर्तव्ये त्यांच्या क्षेत्रापुरती वापरता येतील. निवडणूक, संजय गांधी निराधार योजना किंवा इतर बिगर-महसुली बाबींचे अर्ज इस्लापूर कार्यालयात स्वीकारून ते पुढील कार्यवाहीसाठी मूळ तहसील कार्यालय (किनवट) येथे पाठवले जातील.

या कार्यालयासाठी अपर तहसीलदार पदाची नियुक्ती शासनस्तरावरून केली जाईल, तर इतर कर्मचारी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत उपलब्ध करून दिले जातील. सुरुवातीला तात्पुरत्या इमारतीत हे कार्यालय सुरू करून लवकरच कायमस्वरूपी इमारतीचा प्रस्ताव पाठवला जाईल. पुढील १५ दिवसांत आवश्यक प्रक्रिया पूर्ण करून कार्यालय प्रत्यक्ष सुरू करण्याचे निर्देश शासनाने दिले आहेत.

या निर्णयामुळे किनवट तालुक्यातील दुर्गम भागातील नागरिकांचा वेळ आणि पैसा वाचणार असल्याने परिसरातून समाधान व्यक्त केले जात आहे.

## अचानकपणे गणवेशात बदल;मुख्याध्यापिकेची मनमानी,पालक वैतागले

### सचखंड पब्लिक स्कूलमध्ये गरीब पालकांची लूट!

नांदेड/प्रतिनिधी-येथील गुरुद्वारा सचखंड बोर्ड संस्था अंतर्गत संचलित सचखंड पब्लिक स्कूल शाळेच्या मुख्याध्यापिका अनिल कौर खालसा यांनी आपले निर्णय लादून गरीब व सामान्य पालकांना वेठीस धरल्याच्या अनेक घटना घडल्या असून आता अचानकपणे गणवेशात बदल करुन मोठा खर्च लादला आहे. गणवेशात बदल करतांना शासनाची व प्रशासकाची कोणतीही परवानगी घेतली गेली नाही. शिवाय पालक वर्गाची बैठक घेतली गेली नाही असा आरोप स्थानिक कार्यकर्ते आणि पालकांनी केली आहे. शाळेचा गणवेश अचानक बदलून पालकांची आर्थिक पिळवणूक केल्याची चर्चा सध्या होत आहे. वरील विषयी शिक्षणाधिकारी नांदेड (प्राथमिक) यांच्याकडे लेखी तक्रार सादर करण्यात आली आहे.

तक्रारदार पालक स. जगदीपसिंघ नंबरदार व इतर पालकांनी दिलेल्या तक्रारीनुसार, मुख्याध्यापिकेने कोणताही कार्यालयीन आदेश नसताना जुन्या गणवेशात बदल करून नवीन गणवेशाच्या नावाखाली २ ते ३ प्रकारचे वेगवेगळे ड्रेस घेण्याची सक्ती केली आहे. विशेष म्हणजे हे सर्व ड्रेस त्यांच्या जवळच्या ओळखीच्या एकाच दुकानातून खरेदी करण्याची सक्ती पालकांवर लादली जात आहे. ही शाळा मुळात गोरगरीब, रोजंदारी मिस्त्री, ऑटो चालक, फळे व भाजी विक्रेत्यांच्या मुलांना कमी फीमध्ये सीबीएसई पॅटर्नचे शिक्षण मिळावे या उद्देशाने सुरू करण्यात आली होती. मात्र, वेगवेगळे कारण पुढे करुन अचानकपणे गणवेश बदल्यामुळे गरीब पालकांना हजारो रुपयांचा नाहक भुर्दंड सहन करावा लागत आहे. यामुळे पालकवर्गात मोठा असंतोष पाहावयास मिळत आहे. नियमानुसार शिक्षणाधिकाऱ्यांच्या पूर्वपरवानगीशिवाय गणवेशात बदल करता येत नाही. तसेच गुरुद्वारा बोर्ड अधीक्षकांची लेखी परवानगी व प्रस्ताव आवश्यक आहे. तसेच शैक्षणिक सत्र सुरु होण्याआधी हा निर्णय घेऊन पालकांना त्यांच्या पसंतीच्या दुकानावरुन गणवेश खरेदी करणे किंवा शिऊण घेण्याची मुभा असायला हवी, पण सर्व नियम धाब्यावर बसवून हा जाचक निर्णय घेण्यात आला असल्याचा आरोप होत आहे. या प्रकरणी दि.६ ऑगस्ट २०२६ रोजी माहिती अधिकारात माहिती मागितली असता, माहिती न देता आवाज दाबण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचाही आरोप येथे करण्यात आला आहे. यापूर्वीही अनिल खालसा यांच्याविरुद्ध अनेक समाजसेवकांनी तक्रार केली होती परंतु गुरुद्वारा प्रशासनाने या मुख्याध्यापिकेवर कसलीच कारवाई केलेली नाही. गुरुद्वारा बोर्डाच्या प्रशासकपदी उच्च शिक्षित माजी अधिकारी असून सुद्धा येथे कोणतेच नियम पाळले जात नसून मुख्याध्यापीका राज येथे सुरु असल्याची चर्चा ऐकायला मिळत आहे. या तक्रारीमध्ये जगदीपसिंघ नंबरदारसह स. राजेंद्रसिंघ पुजारी माजी सदस्य, मनबीरसिंघ ग्रंथी, मनिंदरसिंघ रामगडीया, बक्षीसिंघ पुजारी, गुरुबचनसिंघ कारागीर, प्रेमजीतसिंघ शिलेदार, विजेंदरसिंघ बिद्रू शर्मा, अवतारसिंघ, जितेंद्रसिंग ठाकूर, कमलजीत सिंघ रागी यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.या तक्रारीच्या प्रती मा. जिल्हाधिकारी नांदेड, गुरुद्वारा बोर्ड प्रशासक डॉ. विजय सतबीर सिंघ व शिक्षणाधिकारी माध्यमिक, गट शिक्षणाधिकारी यांनाही देण्यात आल्या आहेत. आता या प्रकरणी शिक्षण विभाग काय कारवाई करणार याकडे सर्व पालकांचे लक्ष लागले आहे.

शाळा सुरु होऊन चार महिन्यानंतर गणवेश बदलण्याचा निर्णय घेतला.शाळा सीबीएसई नसून सुद्धा महागडे गणवेश व तीन प्रकारचे गणवेश घेण्याची सक्ती. सीबीएसई शाळा नसतांना ओळखीच्या वेगवेगळ्या प्रकाशनाच्या पुस्तकांचे महागडे पुस्तक सेट खरेदी करावयास भाग पाडले. सीबीएसई शाळेचे कोणतेच प्रस्ताव प्रस्तुत नसतांना सीबीएसई पैटर्नचा प्रचार करुन दिशाभूल केली जात असल्याचे आरोप.गुरुद्वारा बोर्डाची शाळा असल्याचे सांगून गरीब पालकांना दमदाटी केली जात असल्याचा आरोप. मुख्याध्यापिकेवर झालेले मागील आरोप व आर्थिक गैरव्यवहार प्रकरणावर गुरुद्वारा बोर्ड गप्प असल्याचा आरोप.

## साहिल,हम शर्मिंदा हैं!, अब बदलाव जरुरी है!

**एका तरुणाच्या स्वप्नांचा अंत होतो आणि त्यानंतर सुरू होतो तो आरोप-प्रत्यारोपांचा खेळ! मुंबई आयआयटीचा विद्यार्थी साहिल वाकोडे याच्या दुर्दैवी मृत्यूने पुन्हा एकदा देशातील शिक्षणव्यवस्थेच्या संवेदनशीलतेवर आणि विद्यार्थ्यांवरील वाढत्या ताणावर गंभीर प्रश्नचिन्ह उभे केले आहे. साहिलने परीक्षा दिल्यानंतर वसतिगृहातील खोलीत आत्महत्या केली. या घटनेनंतर आयआयटी प्रशासनाने सुरुवातीला परीक्षेदरम्यान मोबाईलचा वापर करून चॅटजीपीटीच्या माध्यमातून उत्तरे शोधल्याचा उल्लेख केला. मात्र, नंतर तपास पूर्ण होण्यापूर्वी अशा प्रकारे निष्कर्ष काढणे अयोग्य असल्याचे मान्य करून संस्थेने माफी मागितली. प्रश्न एवढाच आहे, एखादा विद्यार्थी मृत्युमुखी पडल्यानंतरच व्यवस्थेला आपल्या शब्दांचे गांभीर्य का कळते? आयआयटीसारख्या देशातील सर्वोच्च शिक्षणसंस्थेत प्रवेश मिळविणे हे लाखो विद्यार्थ्यांचे स्वप्न असते. त्यासाठी विद्यार्थी दिवस-रात्र अभ्यास करतात, पालक आयुष्यभराची कमाई खर्च करतात आणि समाज त्यांच्याकडून मोठ्या अपेक्षा ठेवतो. पण या स्वप्नांच्या मागे धावताना त्या विद्यार्थ्यांच्या मनात काय चालले आहे, याचा विचार किती वेळा केला जातो? गुण, परीक्षा, रँक, स्पर्धा आणि करिअरच्या शर्यतीत विद्यार्थी हा माणूस आहे, त्यालाही भीती, अपयश, ताण आणि असुरक्षितता जाणवू शकते, हे आपण विसरत चाललो आहोत का? साहिलच्या प्रकरणात त्याच्यावर नेमके काय घडले, कोणत्या परिस्थितीत घडले आणि त्याच्या मृत्यूमागे कोणते घटक होते, याचा निष्पक्ष तपास होणे आवश्यक आहे. साहिलच्या कुटुंबीयांनी मानसिक छळ आणि जातीय भेदभावाचे आरोप केले आहेत; दुसरीकडे संस्थेने अशा तक्रारींची नोंद झाल्याचे नाकारले आहे. त्यामुळे आरोप खरे की खोटे, याचा निर्णय भावनिक वातावरणात नव्हे तर सखोल आणि पारदर्शक तपासातूनच झाला पाहिजे. मात्र या एका घटनेपलीकडे पाहण्याची वेळ आली आहे. उपलब्ध वृत्तांनुसार, २००६ ते २०२६ या काळात आयआयटी मुंबईत विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांच्या अनेक घटना घडल्या आहेत. साहिलची घटना याच वर्षातील तिसरी असल्याचेही वृत्त आहे. हा आकडा केवळ आकडा म्हणून पाहायचा की, शिक्षणव्यवस्थेसाठी धोक्याची घंटा म्हणून? याचवेळी देशभरातील स्पर्धा परीक्षांमध्ये गैरप्रकार, पेपरफुटी, परीक्षा प्रक्रियेतील त्रुटी आणि निकालांबाबतचे वाद सातत्याने समोर येत आहेत.नीट असो, जेईई असो, एमपीएससी असो किंवा यूपीएससी सारख्या परीक्षा, या परीक्षांवर विद्यार्थ्यांचे संपूर्ण भविष्य अवलंबून असते. अशा वेळी परीक्षा प्रक्रिया पारदर्शक, विश्वासार्ह आणि विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याचा विचार करणारी असणे ही शासन आणि शैक्षणिक संस्थांची मूलभूत जबाबदारी आहे. परीक्षेत गैरप्रकार झाला असेल तर नियमानुसार चौकशी आणि कारवाई झालीच पाहिजे. पण कारवाई म्हणजे विद्यार्थ्याला गुन्हेगार ठरविणे नव्हे. चौकशीपूर्वी सार्वजनिक प्रतिमा मलिन करणे तर अजिबातच नव्हे. साहिल प्रकरणात संस्थेने नंतर माफी मागितली, ही बाबच सुरुवातीच्या निवेदनाच्या गांभीर्यावर प्रश्न निर्माण करते. मृत विद्यार्थ्याच्या संदर्भात केलेल्या चुकीच्या वक्तव्याची भरपाई दोन शब्दांच्या 'सॉरी'ने होऊ शकते का? आता गरज आहे ती दोषारोपांची नव्हे, तर उत्तरदायित्वाची. प्रत्येक मोठ्या शिक्षणसंस्थेत स्वतंत्र आणि प्रभावी विद्यार्थी तक्रार व्यवस्था, नियमित मानसिक आरोग्य समुपदेशन, गोपनीय मदतव्यवस्था आणि विद्यार्थ्यांच्या तक्रारींची तातडीने दखल घेणारी यंत्रणा असली पाहिजे. शिक्षक आणि प्रशासनाने विद्यार्थ्यांशी संवाद साधला पाहिजे. अपयशाला कलंक न मानता ते आयुष्याचा एक टप्पा आहे, अशी मानसिकता निर्माण केली पाहिजे. साहिल आता परत येणार नाही. त्याच्या आई-वडिलांचे स्वप्न, त्याच्या मित्रांचे भविष्याबद्दलचे स्वप्न आणि त्याच्या स्वतःच्या आयुष्याच्या आकांक्षा पुन्हा मिळणार नाहीत. म्हणूनच हा प्रश्न केवळ साहिलचा नाही; तो देशातील प्रत्येक विद्यार्थ्याचा आहे. अजून किती विद्यार्थ्यांचे बळी गेल्यानंतर आपण जागे होणार? साहिल, तुझ्या मृत्यूचे कारण तपासातून स्पष्ट होईल. दोषी कोण हेही कायदा ठरवेल. पण तुझ्या मृत्यूने शिक्षणव्यवस्थेला आरसा दाखवला आहे. त्या आरशात पाहण्याचे धैर्य व्यवस्था दाखवणार आहे का? 'साहिल, हम शर्मिंदा हैं!' पण केवळ 'शर्मिंदा' होऊन चालणार नाही, व्यवस्था बदलावी लागेल.**

# मंत्र्यांना कायद्याचे आणि खात्याचे ज्ञान आवश्यक

मंत्रीपद हे केवळ लाल दिव्याची गाडी, सरकारी दौरे, हार-तुरे आणि स्वागत स्वीकारण्याचे पद नाही. मंत्री म्हणजे एखाद्या खात्याची जबाबदारी स्वीकारणारी व्यक्ती. त्या खात्याशी संबंधित कायदे, नियम, आर्थिक तरतुदी, प्रशासनाची रचना, जनतेच्या समस्या आणि त्यावरील उपाययोजना यांचे पुरेसे ज्ञान मंत्र्यांना असणे आवश्यक आहे. केवळ अधिकाऱ्यांनी दिलेल्या कागदपत्रांवर अवलंबून राहून किंवा दौऱ्याच्या वेळी तयार केलेल्या माहितीपत्रिकेवरून प्रश्नांची उत्तरे देऊन जनतेचा विश्वास संपादन करता येत नाही.



मंत्र्यांचा दौरा हा जनतेसाठी आशेचा विषय असतो. मंत्री गावात येणार म्हटले की नागरिक आपल्या समस्या घेऊन त्यांच्या भेटीसाठी पुढे येतात. शेतकरी शेतीच्या प्रश्नांबाबत विचारणा करतो, व्यापारी बाजारपेठेच्या समस्यांबाबत बोलतो, महिला पाणी, आरोग्य किंवा रोजगाराच्या प्रश्नांबाबत निवेदन देतात, तर विद्यार्थी शिक्षण आणि रोजगाराच्या संधींबाबत प्रश्न विचारतात. अशा वेळी मंत्र्यांकडून समाधानकारक उत्तरे अपेक्षित असतात. मात्र अनेकदा प्रश्नांचा भडिमार झाल्यानंतर नेमके उत्तर काय द्यायचे, याबाबतच संभ्रम निर्माण झालेला दिसतो. मंत्र्यांना प्रत्येक प्रश्नाचे उत्तर तात्काळ देता येईलच असे नाही. परंतु एखाद्या प्रश्नाचे उत्तर माहीत नसेल तर ते स्पष्टपणे सांगून संबंधित अधिकाऱ्याकडून माहिती घेऊन उत्तर देण्याची जबाबदारी स्वीकारता येते. त्याऐवजी सर्व प्रश्नांना केवळ आश्वासने देणे किंवा विषय पुढे ढकलणे योग्य नाही. जनतेला घोषणांची नव्हे, तर प्रत्यक्ष कामाची अपेक्षा असते.मंत्र्यांनी एखादी घोषणा केली, तरी तिच्यामागे आर्थिक तरतूद आहे का, संबंधित विभागाची प्रशासकीय मान्यता आहे का, अर्थ विभागाची सहमती आवश्यक आहे का, कायदेशीर अडचणी आहेत का, याचा विचार आधी होणे गरजेचे आहे. एखाद्या मागणीला तात्काळ मंजुरी देण्याची घोषणा करून नंतर अर्थ विभागाची किंवा अन्य विभागाची परवानगी आवश्यक असल्याचे सांगितले गेले, तर जनतेचा भ्रमनिरास होतो. त्यामुळे मंत्र्यांनी घोषणा करण्यापूर्वी आपल्या खात्याची आणि शासनाच्या आर्थिक प्रक्रियेची माहिती असणे अत्यावश्यक आहे.

मंत्रिमंडळातील प्रत्येक मंत्र्याला आपापल्या खात्याचा सखोल अभ्यास असला पाहिजे. संबंधित खात्याचे कायदे, शासन निर्णय, नियमावली, मागील निर्णय, उपलब्ध निधी, प्रलंबित योजना आणि त्यांची अंमलबजावणी यांचा अभ्यास करूनच मंत्रीपदाची जबाबदारी पार पाडता येते. एखाद्या खात्याचे ज्ञान नसताना केवळ पद मिळाले म्हणून त्या खात्याचा कारभार स्वीकारणे आणि त्यानंतर अधिकाऱ्यांच्या माहितीवरच संपूर्ण निर्णयप्रक्रिया अवलंबून ठेवणे हा जनतेच्या दृष्टीने गंभीर विषय आहे.मंत्री गावात किंवा जिल्ह्यात दौऱ्यावर आले की सरकारी यंत्रणा त्यांच्या स्वागतासाठी मोठी तयारी करते. रस्त्यांची स्वच्छता, स्वागताचे फलक, हार-तुरे, पुष्पगुच्छ, सत्कार समारंभ आणि विविध कार्यक्रम यासाठी वेळ आणि पैसा खर्च होतो. मात्र या सर्वांपेक्षा दौऱ्याचा मूळ उद्देश महत्त्वाचा आहे. मंत्री नेमके कशासाठी आले आहेत? कोणत्या समस्या जाणून घेणार आहेत? किती गावांना भेट देणार आहेत? किती शेतकऱ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधणार आहेत? किती प्रलंबित प्रश्नांचा आढावा घेणार आहेत? याचे उत्तर दौऱ्याच्या कार्यक्रमातून स्पष्ट झाले पाहिजे.दौरा म्हणजे केवळ बैठक घेणे नव्हे. बैठकीत अधिकारी उपस्थित असतात, अहवाल मांडतात आणि आपापल्या विभागाची माहिती देतात. परंतु जनतेच्या समस्या समजून घेण्यासाठी प्रत्यक्ष लोकांमध्ये जाणे आवश्यक आहे. गावात गेल्यानंतर नागरिकांचे म्हणणे ऐकणे, शेतकऱ्यांच्या शेतात जाणे, पाणीटंचाईच्या ठिकाणी पाहणी करणे, रस्त्यांची अवस्था पाहणे, आरोग्य केंद्राला भेट देणे, शाळेतील विद्यार्थ्यांशी संवाद साधणे आणि स्थानिक नागरिकांच्या तक्रारी समजून घेणे हा दौऱ्याचा खरा हेतू असायला हवा.

आज अनेक भाग अनेक समस्यांनी ग्रासलेले आहेत. दुष्काळ, पाणीटंचाई, शेतीमालाला भाव, बेरोजगारी, रस्ते, आरोग्य, शिक्षण, वीज, सिंचन, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या समस्या अशा अनेक प्रश्नांशी नागरिक झुंजत आहेत. अशा वेळी मंत्री दौऱ्यावर आले तर नागरिक प्रश्न विचारणारच. प्रश्न विचारणे हा त्यांचा अधिकार आहे. लोकशाहीमध्ये सत्ताधाऱ्यांना प्रश्न विचारले जाणे हीच लोकशाहीची ताकद आहे. त्यामुळे मंत्र्यांनी प्रश्नांना घाबरण्याचे कारण नाही; उलट त्या प्रश्नांमधून प्रशासनातील त्रुटी समोर येतात.मात्र दौऱ्यापूर्वी संबंधित भागाचा अभ्यास झाला पाहिजे. कोणत्या तालुक्यात दुष्काळाची परिस्थिती आहे, कुठे पाणीटंचाई आहे, कोणत्या गावात रस्त्याचा प्रश्न आहे, कोणत्या भागात शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे, कोणत्या योजना प्रलंबित आहेत, याची माहिती मंत्र्यांकडे असणे अपेक्षित आहे. दौऱ्यावर येऊन सर्व माहिती प्रथमच ऐकण्यापेक्षा दौऱ्यापूर्वी अधिकाऱ्यांकडून संपूर्ण माहिती घेऊन त्यानंतर जनतेशी संवाद साधला तर त्याचा अधिक फायदा होईल. दौऱ्याच्या नावाखाली मोठा सरकारी खर्च होतो. मंत्री, अधिकारी, सुरक्षा यंत्रणा, वाहने, निवास व्यवस्था आणि इतर प्रशासकीय यंत्रणेवर खर्च होतो. हा खर्च जनतेच्या पैशातून होतो. त्यामुळे प्रत्येक दौऱ्याचे फलित काय, याचा विचार करणे आवश्यक आहे. दौरा झाला, बैठक झाली, फोटो काढले गेले, सत्कार झाला आणि दुसऱ्या दिवशी सर्व काही पूर्ववत झाले, तर अशा दौऱ्याचा उपयोग काय? दौऱ्यानंतर किती प्रश्न निकाली निघाले, किती कामांना मंजुरी मिळाली, किती निधी उपलब्ध झाला आणि प्रत्यक्ष किती कामे सुरू झाली, याचा लेखाजोखा जनतेसमोर मांडला पाहिजे.

विशेषतः संकटाच्या काळात मंत्र्यांनी संवेदनशीलता दाखवणे गरजेचे आहे. एखाद्या भागात दुष्काळ असेल, शेतकऱ्यांवर आर्थिक संकट असेल किंवा नागरिकांना मूलभूत सुविधांसाठी संघर्ष करावा लागत असेल, तर सरकारी बैठकीतील औपचारिकता आणि दिखाऊपणापेक्षा त्या परिस्थितीचे गांभीर्य अधिक महत्त्वाचे आहे. बैठकीत कोणते खाद्यपदार्थ ठेवले, कोणत्या प्रकारची व्यवस्था केली, यापेक्षा त्या बैठकीत जनतेच्या प्रश्नांवर किती गांभीर्याने चर्चा झाली, हे महत्त्वाचे आहे.संकटग्रस्त भागात बैठक घेताना प्रशासनाने स्थानिक परिस्थितीचा विचार करणे आवश्यक आहे. सामान्य नागरिक अडचणीत असताना सरकारी कार्यक्रमांमध्ये अनावश्यक दिखाऊपणा टाळला पाहिजे. लोकांच्या मनात शासनाविषयी संवेदनशीलतेची भावना निर्माण झाली पाहिजे. प्रशासनाने जनतेच्या दुःखाशी जोडलेले दिसले पाहिजे.त्याचप्रमाणे मंत्र्यांनी आपल्या दौऱ्यांमध्ये स्थानिक लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते, शेतकरी, कामगार, महिला, युवक आणि सामान्य नागरिक यांचे मत ऐकले पाहिजे. केवळ पक्षाचे पदाधिकारी किंवा जवळचे कार्यकर्ते यांच्या माध्यमातून परिस्थिती समजून घेतली तर वस्तुस्थिती पूर्णपणे समोर येईलच असे नाही. अनेक वेळा प्रत्यक्ष गावात राहणारा सामान्य नागरिक प्रशासनाच्या कामकाजातील त्रुटी अधिक स्पष्टपणे सांगू शकतो. पालकमंत्र्यांची जबाबदारीदेखील मोठी आहे. जिल्ह्याचा पालक म्हणून त्यांनी केवळ शासकीय कार्यक्रमांना उपस्थित राहणे किंवा ध्वजारोहणापुरती भूमिका निभावणे पुरेसे नाही. जिल्ह्यातील प्रश्नांचा सातत्याने आढावा घेणे, विभागीय अधिकाऱ्यांशी चर्चा करणे, प्रलंबित कामांचा पाठपुरावा करणे आणि नागरिकांच्या तक्रारींचे निराकरण करण्यासाठी यंत्रणेला जबाबदार धरणे आवश्यक आहे. जिल्ह्याचा प्रश्न केवळ जिल्हाधिकाऱ्यांच्या अहवालावर सोडून चालणार नाही.



दत्तोपंत डहाळे
नांदेड.

जिल्हाधिकारी आणि वरिष्ठ अधिकारी प्रशासन चालवतात; परंतु लोकप्रतिनिधींची भूमिका वेगळी आहे. अधिकारी नियम आणि कायद्याच्या चौकटीत काम करतात. मंत्री आणि लोकप्रतिनिधींनी जनतेच्या प्रश्नांना शासनाच्या धोरणांशी जोडून त्यावर उपाय शोधणे अपेक्षित आहे. त्यामुळे जिल्हाधिकारी सांगतील तेच खरे या पद्धतीने सर्व निर्णय घेण्यापेक्षा अधिकाऱ्यांच्या अहवालाची स्वतंत्रपणे छाननी करून जनतेच्या बाजूने वस्तुस्थिती समजून घेणे आवश्यक आहे.मंत्र्यांच्या दौऱ्यांमध्ये आणखी एक बाब प्रकर्षाने जाणवते ती म्हणजे स्वागत आणि प्रसिद्धी. हार-तुरे, पुष्पगुच्छ, मोठमोठे सत्कार, फलक आणि छायाचित्रे यामध्ये बराच वेळ जातो. मंत्री आले की स्वागत झाले पाहिजे, परंतु स्वागताचा कार्यक्रम हा दौऱ्याचा केंद्रबिंदू होता कामा नये. मंत्री जनतेसाठी आहेत, जनतेकडून सत्कार करून घेण्यासाठी नाहीत, ही भावना राजकीय नेतृत्वाने जपली पाहिजे.धार्मिक कार्यक्रमांच्या निमित्तानेही लोकप्रतिनिधींचे मोठ्या प्रमाणात स्वागत केले जाते. गणेशोत्सव असो, नवरात्रोत्सव असो किंवा अन्य धार्मिक उत्सव असो, सर्व देवस्थानांकडे आणि सर्व मंडळांकडे समान दृष्टीने पाहणे आवश्यक आहे. समाजातील धार्मिक भावना सर्वांसाठी समान असतात. एका मंडळाला विशेष महत्त्व आणि दुसऱ्या मंडळाकडे दुर्लक्ष अशी भावना निर्माण होणार नाही, याची काळजी घेणे गरजेचे आहे. धर्माच्या नावावर भेदाभेद न करता सर्व नागरिकांना समान न्याय देणे हे लोकप्रतिनिधींचे कर्तव्य आहे. मंत्र्यांच्या दौऱ्यांचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे पारदर्शकता. दौऱ्यावर किती खर्च झाला, कोणत्या कामासाठी निधी मंजूर झाला, कोणत्या मागण्यांवर निर्णय झाला, कोणत्या मागण्या विचाराधीन आहेत आणि कोणत्या मागण्या कायदेशीर किंवा आर्थिक कारणांमुळे प्रलंबित आहेत, याची माहिती जनतेला मिळाली पाहिजे. लोकशाहीत सार्वजनिक पदावर असणाऱ्यांच्या कामाचा लेखाजोखा सार्वजनिक असणे आवश्यक आहे.

मंत्र्यांच्या मालमत्तेबाबतही पारदर्शकता आणि कायदेशीर घोषणांची व्यवस्था आहे. त्यामुळे सार्वजनिक जीवनात असलेल्या व्यक्तींनी आपल्या आर्थिक व्यवहारांबाबत कायद्याने आवश्यक असलेली माहिती नियमानुसार जाहीर करणे आणि सार्वजनिक पदाचा वापर वैयक्तिक फायद्यासाठी होणार नाही, याची खात्री देणे महत्त्वाचे आहे. जनतेचा विश्वास हा केवळ भाषणांमधून निर्माण होत नाही; तो पारदर्शक आचरणातून निर्माण होतो.मुख्यमंत्र्यांची भूमिका या संपूर्ण प्रक्रियेत अत्यंत महत्त्वाची आहे. मंत्र्यांचे दौरे किती असावेत, कोणत्या भागात जावे, कोणत्या प्रश्नांना प्राधान्य द्यावे, दौऱ्यानंतर निर्णयांची अंमलबजावणी कशी तपासावी, याबाबत स्पष्ट व्यवस्था असली पाहिजे. मंत्र्यांनी केवळ दौरे केले म्हणजे प्रशासन गतिमान झाले असे मानता येणार नाही. दौऱ्याचे परिणाम मोजले गेले पाहिजेत.सप्टेंबर संपतो, ऑक्टोबर येतो आणि ऑक्टोबरमध्ये निर्णय घेऊ, पुढील बैठकीत पाहू, अर्थ विभागाशी चर्चा करू अशी उत्तरे मिळत राहिली, तर सामान्य नागरिकांचा संयम संपतो. संकटग्रस्त नागरिकांसाठी प्रत्येक दिवस महत्त्वाचा असतो. शेतकऱ्याला पिकाचे नुकसान झाले असेल तर त्याला महिन्यांनंतर मिळणारे आश्वासन उपयोगाचे नसते. पाणीटंचाई असलेल्या गावाला पावसाळा संपल्यानंतर बैठक घेऊन उपयोग नाही. प्रश्न निर्माण झाल्यानंतर त्यावर वेळेत निर्णय घेणे हे प्रशासनाचे कर्तव्य आहे. म्हणूनच मंत्र्यांनी दौरे करण्यापूर्वी त्या भागाचा अभ्यास करावा, संबंधित खात्याचे कायदे आणि नियम समजून घ्यावेत, आर्थिक तरतुदींची माहिती घ्यावी आणि अधिकाऱ्यांकडून वस्तुस्थिती जाणून घ्यावी. दौऱ्यात सामान्य नागरिकांशी प्रत्यक्ष संवाद साधावा. प्रश्न विचारणाऱ्या नागरिकांकडे त्रासदायक व्यक्ती म्हणून न पाहता त्यांचा प्रश्न शासनापर्यंत पोहोचवणारा नागरिक म्हणून पाहावे.

मंत्रीपद ही प्रतिष्ठा नसून जबाबदारी आहे. लाल गाडी, सुरक्षा व्यवस्था, सरकारी निवास, दौरे आणि सत्कार हे पदाचे बाह्य स्वरूप आहे; परंतु पदाचे खरे मोजमाप जनतेच्या आयुष्यात झालेल्या बदलातून होते. एखाद्या गावाला पाणी मिळाले, एखाद्या शेतकऱ्याला योग्य मदत मिळाली, एखाद्या विद्यार्थ्याचा प्रश्न सुटला, एखाद्या रुग्णालयात सुविधा वाढल्या, एखादा रस्ता झाला किंवा एखाद्या प्रशासनिक अडचणीचे निराकरण झाले, तर त्या कामातून मंत्रीपदाची सार्थकता दिसते.राज्याचा कारभार सांभाळणे सोपे नाही. विविध भाग, विविध समाजघटक, असंख्य मागण्या, मर्यादित आर्थिक साधने आणि कायदेशीर बंधने यांचा समतोल साधावा लागतो. त्यामुळे मंत्र्यांकडूनही प्रत्येक मागणी तात्काळ मान्य करण्याची अपेक्षा असू शकत नाही. मात्र काय शक्य आहे आणि काय शक्य नाही, हे स्पष्टपणे सांगण्याची अपेक्षा नक्कीच करता येते. जनतेला खोटी आश्वासने देण्यापेक्षा वास्तव परिस्थिती सांगणे अधिक योग्य आहे.सरकारनेही मंत्र्यांच्या दौऱ्यांचे मूल्यमापन करण्याची पद्धत विकसित केली पाहिजे. दौऱ्यापूर्वी समस्या, दौऱ्यातील चर्चा, बैठकीतील निर्णय, मंजूर निधी, जबाबदार विभाग आणि निर्णयाच्या अंमलबजावणीची अंतिम मुदत अशी स्पष्ट नोंद असावी. काही महिन्यांनी त्याचा आढावा घेऊन किती निर्णयांची अंमलबजावणी झाली, याची माहिती सार्वजनिक केली तर दौऱ्यांची उपयुक्तता स्पष्ट होईल.शेवटी प्रश्न एवढाच आहे की, मंत्री दौऱ्यावर का जातात? हार-तुरे स्वीकारण्यासाठी, छायाचित्रे काढण्यासाठी, बैठक घेतल्याची नोंद करण्यासाठी आणि प्रसिद्धी मिळवण्यासाठी की जनतेच्या समस्या समजून घेऊन त्यावर ठोस निर्णय घेण्यासाठी? उत्तर दुसरे असले पाहिजे.जनता प्रश्न विचारणारच. शेतकरी आपल्या नुकसानीची भरपाई मागणारच. बेरोजगार युवक रोजगाराबाबत विचारणारच. महिला पाणी आणि सुरक्षिततेबाबत प्रश्न विचारणारच. विद्यार्थी शिक्षण आणि परीक्षांबाबत विचारणारच. व्यापारी आणि कामगार आपापल्या अडचणी मांडणारच. या प्रश्नांपासून पळ काढून कोणत्याही लोकशाही व्यवस्थेला पुढे जाता येणार नाही.

म्हणून मंत्र्यांना कायद्याचे ज्ञान असावे, आपल्या खात्याचा सखोल अभ्यास असावा, आर्थिक प्रक्रियेची माहिती असावी, जनतेशी संवाद साधण्याची तयारी असावी आणि दौऱ्यानंतर निर्णयांची अंमलबजावणी करण्याची इच्छाशक्ती असावी. मुख्यमंत्र्यांनीही आपल्या मंत्र्यांच्या दौऱ्यांचा आणि त्यांच्या परिणामांचा नियमित आढावा घ्यावा. सरकारी पैसा, वेळ आणि यंत्रणा खर्च करून होणारा प्रत्येक दौरा जनतेच्या हितासाठी परिणामकारक ठरला पाहिजे. दौरे कमी-जास्त हा मुद्दा नाही; दौऱ्यांचा उपयोग काय झाला हा खरा प्रश्न आहे. स्वागत किती झाले, यापेक्षा प्रश्न किती सुटले हे महत्त्वाचे. किती बैठका झाल्या यापेक्षा किती निर्णयांची अंमलबजावणी झाली हे महत्त्वाचे. किती छायाचित्रे प्रसिद्ध झाली यापेक्षा किती नागरिकांच्या आयुष्यात प्रत्यक्ष बदल झाला हे महत्त्वाचे. राजकारणात पद मिळवणे ही सुरुवात आहे; त्या पदाला न्याय देणे ही खरी कसोटी आहे. जनतेच्या पैशातून चालणाऱ्या शासनव्यवस्थेत प्रत्येक मंत्री हा जनतेला उत्तरदायी असला पाहिजे. म्हणूनच मंत्र्यांनी लाल गाडीच्या प्रतिष्ठेपेक्षा कायद्याचे ज्ञान, प्रसिद्धीपेक्षा जनसेवा आणि दौऱ्यांपेक्षा त्यांच्या परिणामांना महत्त्व द्यावे. तेव्हाच मंत्रीपदाची खरी प्रतिष्ठा वाढेल आणि लोकशाहीवरील जनतेचा विश्वास अधिक दृढ होईल.

## वाहनांच्या वायुप्रदूषण तपासणीच्या सुधारित दरांची अंमलबजावणी

नांदेड/प्रतिनिधी- राज्यातील मोटार वाहनांच्या वायुप्रदूषण तपासणीच्या दरांमध्ये शासनाने सुधारणा करून सुधारित दरवाढीस मंजुरी दिली आहे. त्यानुसार वाहनांच्या प्रकारानुसार व इंधनाच्या प्रकारानुसार वायुप्रदूषण तपासणीचे सुधारित दर निश्चित करण्यात आले आहेत.

सुधारित दरानुसार दुचाकी वाहनांसाठी ६० रुपये, पेट्रोलवर चालणाऱ्या तीनचाकी वाहनांसाठी १२० रुपये, पेट्रोल, सीएनजी व एलपीजीवर चालणाऱ्या वाहनांसाठी १५० रुपये, तर डिझेलवर चालणाऱ्या वाहनांसाठी १८० रुपये तपासणी शुल्क निश्चित करण्यात आले आहे.वाहनधारकांनी आपल्या वाहनाची विहित मुदतीत वायुप्रदूषण तपासणी करून अधिकृत प्रदूषण तपासणी केंद्रातून प्रमाणपत्र प्राप्त करावे, असे आवाहन प्रादेशिक परिवहन विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.याबाबत प्रादेशिक परिवहन अधिकारी, नांदेड यांच्या सूचनेनुसार सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, नांदेड यांनी ही माहिती दिली आहे.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# हदगांव शहराच्या प्रमुख रस्त्यांवर बेशिस्त वाहनांची पार्किंग

## वाहतूक कोंडीने नागरिक त्रस्त;पादचाऱ्यांनाही धड चालता येईना

हदगांव/प्रतिनिधी-शहरातील प्रमुख रस्त्यांवर बेशिस्तपणे वाहने उभी करण्याचा प्रकार दिवसें .दिवस वाढत असून पोलीसाचे कमालीचे दुर्लक्ष यामुळे सर्वसामान्य नागरिकांना मोठ्या वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. रस्त्यावरच वाहने उभी करून ठेवली जात असल्याने ये-जा करणाऱ्या वाहन चालकांसह पादचाऱ्यांनाही जीव मुठीत धरून मार्ग काढावा लागत आहे.

विशेषतः तहसिल कार्यालयाच्या परिसरात तामासा रोड गर्दीच्या ठिकाणी हा प्रकार सर्रास सुरू असून, संबंधित यंत्रणेकडून ठोस कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.हदगांव शहरातील बस्थानक परिसर राठी चौक आठवडी बाजारपेठ, पोलीस स्टेशन परिसरमुख्य रस्ता तसेच वर्दळीच्या परिसरात रस्त्याच्या कडेला तसेच काही ठिकाणी थेट रस्त्याच्या मध्यभागी वाहने उभी केली जात असल्याचे चित्र दिसून येते. दुकानांसमोर ग्राहकांची वाहने, मालवाहू वाहने तसेच इतर खासगी वाहने उभी राहत असल्याने रस्त्यावरील उपलब्ध जागा मोठ्या प्रमाणात कमी होत आहे.त्यामुळे एकाच वेळी दोन्ही दिशेने वाहने आल्यास वाहतूक ठप्प होण्याची परिस्थिती निर्माण होत आहे. या बेशिस्त पार्किंगचा सर्वाधिक फटका पादचाऱ्यांना बसत असून, रस्त्यावरून चालताना त्यांना वाहनांच्या मधून वाट काढावी लागत आहे. शाळकरी मुले, ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना रस्ता ओलांडतानाही मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. आपत्कालीन सेवांनाही अडथळ्याची शक्यतावाहतूक कोंडीमुळे आपत्कालीन परिस्थितीत रुग्णवाहिका, अग्निशमन दलाची वाहने किंवा इतर अत्यावश्यक सेवेची वाहने मार्गस्थ करताना अडथळे निर्माण होण्याची शक्यता आहे. एखादी गंभीर घटना घडल्यानंतरच प्रशासनाला जाग येणार का, असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. बेशिस्त पार्किंगला आळा घालून रस्ते वाहतुकीसाठी मोकळे ठेवावेत, तसेच नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर तत्काळ कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांतून होत आहे. आता प्रशासन या गंभीर समस्येकडे गांभीर्याने लक्ष देऊन ठोस उपाययोजना कधी करणार, याकडे नागरिकांचे लक्ष लागले

**सबकुछ लोकप्रतिनिधी....**

तालुक्यातील प्रशासना-विषयी सर्व सामान्य नागरिकांची तिव्र नाराजी दिसून येत असून कोणतेही काम लोकप्रतिनिधीने शिवाय किंवा सूचना दिल्याशिवाय प्रशासन काम करत नाही असा समज झालेला आहे. सर्वसामान्याच्या केलेल्या सूचनाकडे व तक्रारीकडे कमालीचे दुर्लक्ष होत असून याबाबत सर्वसामान्य नागरिकात मात्र प्रशासनाची तीव्र नाराजी पसरत आहे, हे आवर्जून उल्लेख करावा लागेल...!



## रघुनाथराव लोणे लहानकर यांचे निधन

नांदेड/प्रतिनिधी-लहान ता. अर्धापूर येथील ज्येष्ठ नागरिक तथा डोंगरकडा सहकारी साखर कारखान्याचे सेवानिवृत्त शेतकी अधिकारी रघुनाथराव केरबाजी लोणे लहानकर यांचे बुधवारी वृद्धापकाळामुळे नांदेडच्या एका खासगी रुग्णालयात उपचारादरम्यान निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ७५ वर्षे होते. त्यांच्या पश्चात दोन मुले व एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. कालवश रघुनाथराव लोणे हे महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण विभाग, मुंबई येथील क्षेत्रअधिकारी प्रमोद लोणे यांचे वडील होते.




गणेश विर्सजनाच्या पार्श्वभूमीवर नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेत आ.बालाजी कल्याणकर, आ.आनंदराव पाटील बोंढारकर यांच्या उपस्थितीत बैठक घेण्यात आली. या बैठकीला मनपा आयुक्त डॉ.महेशकुमार डोईफोडे, अतिरिक्त आयुक्त गिरीष कदम, डीवायएसपी रामेश्वर वैजने, नगरसचिव अजितपालसिंघ संधू, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख गंगाधर बडुरे, विनय गिरडे पाटील, शहरप्रमुख तुलजेश यादव, नगरसेवक संदीपसिंघ गाडीवाले, योगेश मुंडे यांच्यासह इतर उपस्थित होते.

# बोथ फाट्यावर चोरट्यांचा धुमाकूळ;एकाच रात्री सात दुकाने फोडली!

## बार,दोन कृषी सेवा केंद्रांसह चार पानटपऱ्या लुटल्या

मांडवी/प्रतिनिधी-मांडवी पोलिस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या बोथ फाटा येथे अज्ञात चोरट्यांनी एकाच रात्री तब्बल सात व्यावसायिक प्रतिष्ठानांना लक्ष्य केल्याने परिसरात तीव्र खळबळ उडाली आहे. एका बारसह दोन कृषी सेवा केंद्रे आणि चार पानटपऱ्यांचे कुलूप व टिनपत्रे तोडून साखळी चोरी करण्यात आली. बोथ फाटा परिसरात अशा प्रकारची धाडसी चोरी पहिल्यांदाच घडल्याने स्थानिक व्यापारी व नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

ही घटना १९ सप्टेंबर रोजी पहाटेच्या सुमारास घडली. बोथ फाटा येथील कोडय्या इलमया इरकोटी यांच्या 'लकी बार अँड रेस्टॉरंट'च्या मागील दरवाजाचे कुलूप व टिनपत्रा तोडून चोरट्यांनी आत प्रवेश केला. बारमधील ५० हजार ९९५ रुपयांची विदेशी दारू व बीअर, ६ हजार रुपयांचा सीसीटीव्ही कॅमेरा व डीव्हीआर, तसेच गल्ल्यातील ८ हजार रुपये रोख असा एकूण ६४ हजार ९९५ रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला.लकी बारनंतर चोरट्यांनी परिसरातील इतर दुकानांकडे मोर्चा वळवला. यामध्ये तुळजाई कृषी सेवा केंद्र, कैलास कृषी सेवा केंद्र, कपिल पानटपरी, नवीन पानटपरी,रोशन पानटपरी, मयूर पान शॉप (मयूर जनरल स्टोअर्स) या दुकानांचा समावेश आहे. काही दुकानांचे कुलूप व टिनपत्रे तोडून चोरी करण्यात आली, तर काही ठिकाणी चोरीचा प्रयत्न झाला. एकाच रात्री सात दुकाने फोडल्याची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. माहूरचे उपविभागीय पोलिस अधिकारी किरण बोंडवे तसेच मांडवीचे सहा.पो.नि.गंगाधर गायकवाड यांनी घटनास्थळाची पाहणी करून व्यापाऱ्यांना धीर दिला. या प्रकरणी मांडवी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. परिसरातील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे पोलिस चोरट्यांचा शोध घेत आहेत. दरम्यान, या साखळी चोरीच्या पार्श्वभूमीवर बोथ फाटा परिसरात रात्रीची पोलिस गस्त वाढवण्यात यावी, अशी मागणी व्यापारी वर्गाकडून होत आहे.

# कंधारच्या तालुका आरोग्य अधिकारीपदी डॉ.चंद्रकांत पाटील रुजू



कंधार/प्रतिनिधी-कंधारच्या तालुका आरोग्य अधिकारीपदी डॉ. चंद्रकांत पाटील यांची नियुक्ती झाली असून त्यांनी नुकताच पदभार स्वीकारला. त्यांच्या रुजू होण्याचे आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी स्वागत करून अभिनंदन केले.

डॉ. चंद्रकांत पाटील हे एमबीबीएस, एमडी, पी.एस.एम. पदवीधारक असून त्यांना आरोग्य विभागातील कामाचा प्रदीर्घ अनुभव आहे. यापूर्वी त्यांनी कंधार ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी म्हणून तब्बल पाच वर्षे सेवा बजावली आहे. त्यानंतर त्यांनी यवतमाळ जिल्ह्यातील महागाव येथील उपजिल्हा रुग्णालयातही वैद्यकीय सेवा बजावली. कंधार तालुका आरोग्य अधिकारी पदाचा कार्यभार स्वीकारल्या नंतर मावळते प्रभारी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. रमेश गावाले यांनी डॉ. चंद्रकांत पाटील यांचे स्वागत केले. यावेळी जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे वरिष्ठ सहाय्यक कुमार कांबळे यांनीही त्यांचे स्वागत करून शुभेच्छा दिल्या. तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयातील आरोग्य सहाय्यक बालाजी काल्हाळे, व्यंकटी शेळके, गणपत मुंढे, बी.एन.ओ. अविला इंगोले, वरिष्ठ लिपिक चंद्रमुनी भावे, तालुका समूह संघटक सुशील आलेगावकर, लेखापाल राम प्रेमलवाड, मंगेश कुलकर्णी, बालाजी काकडे, एकनाथ पठाडे, राहुल पेठकर तसेच कार्यालयीन सेविका बी.एम. कँठेवाड यांनी डॉ. चंद्रकांत पाटील यांचे अभिनंदन केले.या प्रसंगी आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# मुखेड तालुका दुष्काळग्रस्त जाहीर करण्याच्या मागणीसाठी काँग्रेसचे आंदोलन

मुखेड/प्रतिनिधी-तालुक्यात यंदा झालेल्या अत्यल्प पावसामुळे निर्माण झालेली भयानक दुष्काळी परिस्थिती पाहता मुखेड तालुका तात्काळ दुष्काळग्रस्त जाहीर करावा,यासह शेतकरी, विद्यार्थी, शेतमजूर आणि दिव्यांगांच्या विविध प्रलंबित मागण्या मंजूर कराव्यात या मागणीसाठी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मुखेडचे तहसीलदार यांच्यामार्फत काँग्रेस महाविकास आघाडीच्या वतीने घंटानाद आंदोलन करून जाहीर निवेदन सादर करण्यात आले.

या निवेदनात तालुक्यातील शेतकरी व नागरिकांच्या बिकट परिस्थितीकडे शासनाचे लक्ष वेधण्यात आले आहे.पावसाअभावी हाताशी आलेली पिके पूर्णपणे करपून गेल्याने बळीराजा आर्थिक संकटात सापडला आहे. या गंभीर परिस्थितीवर मात करण्यासाठी शासनाने आंदोलकांच्या मागण्या तात्काळ मंजूर कराव्यात अशी मागणी करण्यात आली आहे.मुखेड तालुका अधिकृतपणे दुष्काळग्रस्त घोषित करून बाधित शेतकऱ्यांना हेक्टरी १ लक्ष रुपयांची तातडीची आर्थिक मदत द्यावी.नुकसानग्रस्त सर्व शेतकऱ्यांना कोणत्याही किचकट अटींशिवाय पीक विम्याची रक्कम त्वरित मंजूर करावी.चालू कर्जदार शेतकऱ्यांनाही थकीत कर्जदारांप्रमाणेच २ लक्ष रुपयांपर्यंत कर्जमाफी देऊन दिलासा द्यावा.दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता तालुक्यातील सर्व विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क पूर्णपणे माफ करावे.पशुधन वाचवण्यासाठी तालुक्यात ठिकठिकाणी चारा छावण्या उभारण्यात याव्यात,तसेच मजुरांचे आणि बेरोजगारांचे स्थलांतर रोखण्यासाठी 'रोहयो'अंतर्गत हाताला कामे उपलब्ध करून द्यावीत. अन्यथा तालुक्यातील शेतकरी, शेतमजूर आणि नागरिक रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडतील, असा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

# उमरखेड-ढाणकी मार्गावर गोवंश मांस जप्त;एकावर गुन्हा दाखल

उमरखेड/प्रतिनिधी-गोवंश मांसाची अॅपे ऑटोने वाहतूक होत असल्याच्या माहितीवरून उमरखेड पोलिसांनी दि. २२ सप्टेंबर रोजी सकाळी ११.३० वाजताच्या सुमारास कारवाई करत सुमारे १०० किलो मांस वाहनासह जप्त केले आहे. या प्रकरणी ऑटो चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करून त्याला अटक करण्यात आली आहे.

पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, एमएच २६ बीडी १०६१ क्रमांकाच्या अॅपे ऑटोने उमरखेडकडून ढाणकीकडे गोवंश मांस नेले जात असल्याची खात्रीशीर माहिती गोरक्षकाने उमरखेड पोलीस ठाण्याला दिली होती. माहिती मिळताच एएसआय गजानन होडगीर यांनी स्टाफसह झाडगावजवळ सापळा रचून ऑटो थांबवला. तपासणी केली असता ऑटोमध्ये अंदाजे २० हजार रुपये किमतीचे सुमारे १०० किलो गोवंश जातीचे मांस आढळून आले.पोलिसांनी मांस व वाहन जप्त करून आरोपी जुबेर उल्ला खान (वय ३४, रा. महात्मा फुले वार्ड, उमरखेड) याच्याविरुद्ध महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियमान्वये गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास एएसआय दिलीप चव्हाण करीत आहेत.

# तलाठी संघ देगलूरच्या अध्यक्षपदी डी.जी.रातोळीकर यांची बिनविरोध निवड

देगलूर/प्रतिनिधी-महाराष्ट्र राज्य तलाठी संघाच्या देगलूर तालुका शाखेच्या अध्यक्षपदी डी. जी. रातोळीकर यांची बिनविरोध निवड करण्यात आली. संघटनेच्या पदाधिकाऱ्यांच्या निवडीवेळी सर्वानुमते निर्णय घेत देगलूर तालुका तलाठी संघाची नवी कार्यकारिणी जाहीर करण्यात आली.

तलाठी संघाच्या सचिवपदी प्रकाश तोटेवाड, उपाध्यक्षपदी संग्राम शिंदे, कार्याध्यक्षपदी आनंद करडे, तर कोषाध्यक्षपदी रवी कापसे यांची निवड करण्यात आली. सहसचिवपदी महेश पदाजी आणि प्रसिद्धी प्रमुखपदी गंगाधर म्हेत्रे यांची नियुक्ती करण्यात आली. संघटनेच्या कामकाजाला अधिक व्यापक स्वरूप देण्यासाठी संघटक म्हणून संजय भांगे व क्षीरसागर बालाजी यांची निवड करण्यात आली. तसेच महिला प्रतिनिधी म्हणून सुचिता मारकवाड व वर्षा शितोळे यांची निवड करण्यात आली. प्रवक्तेपदी बळी कदम यांची, तर सल्लागारपदी भास्कर इप्पर व तानाजी डावरगावे यांची निवड करण्यात आली.



नवनिर्वाचित अध्यक्ष डी. जी. रातोळीकर यांच्या नेतृत्वाखाली तलाठी संवर्गाच्या विविध प्रश्नांनाप्रभावीपणे वाचा फोडण्यासोबतच संघटनेची एकजूट अधिक मजबूत करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे उपस्थित तलाठी बांधवांनी अभिनंदन करून पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या. एकमतातून झालेली बिनविरोध निवड ही संघटनेतील एकजुटीचे प्रतीक असून, नव्या कार्यकारिणीकडून तलाठी संवर्गाच्या प्रश्नांसाठी भक्कमपणे काम करण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

**तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय**

Email Id:tahkadhar@gmail.com जा.क्रं.२०२६/ज.मृ.नों./कावी
दुरध्वनी क्र.२२३१००-०२४६६ दिनांक - १६/०७/२०२६

**(जन्म मृत्यू शाखा)**

**जाहीर प्रगटन**

याद्वारे प्रगटन देण्यात येते की अर्जदार पार्वती भ्र.नामदेव कांबळे रा. कल्लाळी ता.कंधार जि.नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचा नामदेव रावसाहेब कांबळे रा.कल्हाळी ता.कंधार जि.नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म/मृत्यू झालेल्यांचे नाव नामदेव रावसाहेब कांबळे रा.कल्हाळी ता.कंधार या ठिकाणी दिनांक ०७/१०/२०११ या दिवशी जन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक १५/०७/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म/मृत्यू दिनांक बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

स्वाक्षरित/-
तहसीलदार कंधार

**तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय**

Email Id:tahkadhar@gmail.com जा.क्रं.२०२६/ज.मृ.नों./कावी
दुरध्वनी क्र.२२३१००-०२४६६ दिनांक - १६/०७/२०२६

**(जन्म मृत्यू शाखा)**

**जाहीर प्रगटन**

याद्वारे प्रगटन देण्यात येते की अर्जदार स्नेहा गणेश ढवळे रा.कंधार ता.कंधार जि.नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचा स्नेहा गणेश ढवळे रा.कंधार ता.कंधार जि.नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म/मृत्यू झालेल्यांचे नाव स्नेहा गणेश ढवळे रा.कंधार ता.कंधार या ठिकाणी दिनांक ०१/०६/२००२ या दिवशी जन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक १५/०७/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म/मृत्यू दिनांक बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

स्वाक्षरित/-
तहसीलदार कंधार

**तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय**

Email Id:tahkadhar@gmail.com जा.क्रं.२०२६/ज.मृ.नों./कावी
दुरध्वनी क्र.२२३१००-०२४६६ दिनांक - १०/०८/२०२६

**(जन्म मृत्यू शाखा)**

**जाहीर प्रगटन**

याद्वारे प्रगटन देण्यात येते की अर्जदार योगेश ज्ञानोबा बिजे रा.संगुचीवाडी ता.कंधार जि.नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचा योगेश ज्ञानोबा बिजे रा.संगुचीवाडी ता.कंधार जि.नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म/मृत्यू झालेल्यांचे नाव योगेश ज्ञानोबा बिजे रा.संगुचीवाडी ता.कंधार या ठिकाणी दिनांक ०९/०२/२००६ या दिवशी जन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक ३०/०८/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म/मृत्यू दिनांक बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

स्वाक्षरित/-
तहसीलदार कंधार

**CHANGE IN NAME**

My (old name) is **KHAN IQBAL AHMED KHAN ABDUL RASHEED** which now I am, changing as (new name) **IQBAL AHMED KHAN ABDUL RASHEED KHAN** R/o Rameshwar plot, near Madina nagar Gulzar colony Parbhani-431401

**CHANGE IN NAME**

My (old name) is **ASMA SHAHEDA** which now I am, changing as (new name) **ASMA SHAHEDA MOHAMMAD NUSRATH**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by
**ASMA SHAHEDA MOHAMMAD NUSRATH**
R/o 5-1-319, Fateh buruj, near old water tank, Itwara Nanded-431604
M. No.-7057748689

# मांडवीच्या अप्पर तहसीलवर शासनाकडून फुसका बार;५२ खेड्यांतील नागरिकांमध्ये संतापाची लाट

(विशेष प्रतिनिधी)

मांडवी:दीर्घकाळापासून प्रलंबित असलेल्या मांडवी येथील अप्पर तहसील कार्यालयाची मागणी पुन्हा एकदा डावलली गेल्याने मांडवी परिसरातील ५२ खेड्यांतील नागरिकांमध्ये शासनाविरोधात तीव्र संतापाची लाट पसरली आहे. शासनाने २२ सप्टेंबर रोजी विशेष आदेश काढून किनवट तालुक्यातील इस्लापूरसह राज्यातील विविध अप्पर तहसील कार्यालयांना मंजुरी दिली, मात्र या यादीत मांडवीचा समावेश नसल्याने स्थानिकांच्या पदरी पुन्हा निराशाच पडली आहे.



मांडवी येथे अप्पर तहसील कार्यालय व्हावे यासाठी ५ जुलै रोजी माजी उपसरपंच धनलाल पवार यांनी आमरण उपोषण सुरू केले होते. त्यावेळी आ.भीमराव केराम यांनी इस्लापूरसोबतच मांडवीच्या मंजुरीसाठी आक्रमक भूमिका

## हिवाळी अधिवेशनात प्रश्न मार्गी लावू-आ.केराम

घेतली होती. आमदार केराम यांच्या आक्रमक पवित्र्यामुळे शासनस्तरावर हालचालींना वेग आला होता आणि मांडवीचा प्रश्न मार्गी लागेल अशी आशा निर्माण झाली होती. परंतु, २२ सप्टेंबरच्या आदेशात मांडवीचा उल्लेख नसल्याने परिसरातील ५२ गावांचा प्रश्न पुन्हा टांगणीला लागला आहे. या संदर्भात आमच्या प्रतिनिधीने आ.भीमराव केराम यांच्याशी भ्रमणध्वनीवरून संपर्क साधला असता त्यांनी नागरिकांना धीर दिला. मांडवी परिसरातील जनतेने घाबरून जाऊ नये. मांडवी अप्पर तहसील कार्यालयाचा प्रस्ताव आणि प्रक्रिया अंतिम टप्प्यात (प्रोसेसमध्ये) आहे. येणाऱ्या हिवाळी अधिवेशनात हा प्रश्न सभागृहात मांडून मांडवीच्या अप्पर तहसील कार्यालयाला मंजुरी मिळवून देऊ, असे आश्वासन आमदार केराम यांनी दिले. दरम्यान, या संपूर्ण घडामोडींनंतर आता सर्व मदार आ.भीमराव केराम यांच्यावरच अवलंबून आहे. मांडवी आणि परिसरातील भारतीय जनता पक्षाच्या सर्व स्थानिक पदाधिकाऱ्यांनी व पुढाऱ्यांनी पक्षांतर्गत मतभेद बाजूला ठेवून आमदारांच्या पाठीशी ठामपणे उभे राहावे आणि शासनाकडून ही मंजुरी आणण्यासाठी एकत्र प्रयत्न करावेत, अशी तीव्र मागणी मांडवी भागातील नागरिक व शेतकऱ्यांमधून केली जात आहे.

# उमरखेड बसस्थानक परिसरात हाणामारी;परस्परविरोधी गुन्हे दाखल

उमरखेड/प्रतिनिधी-फोनवरून शिवीगाळ केल्याच्या कारणावरून झालेल्या वादातून उमरखेड बस स्थानक परिसरातील वर्षा ड्रेसेससमोर दि. २१ सप्टेंबर रोजी रात्री १० वाजताच्या सुमारास चाकू व लोखंडी रॉडने हाणामारी झाल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी परस्परविरोधी तक्रारींवरून उमरखेड पोलीस ठाण्यात दोन्ही गटांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पहिल्या फिर्यादीत म्हटले आहे की, बस स्थानकाजवळ फोनवर विशिष्ट समाजाचा उल्लेख करून शिवीगाळ का करतो, असे विचारले असता आरोपी विनोद बबन पोंगाणे (वय ५२, रा. शिवाजी वार्ड, उमरखेड) याने तुम्ही मला हटकणारे कोण असे म्हणून दहा मिनिटांत हातात चाकू घेऊन येत फिर्यादी शेख इस्त्राईल शेख महमूद (वय ५३, रा. रहीम नगर) यांच्या डोक्यावर व हातावर वार करून गंभीर जखमी केले. तसेच भांडण सोडवण्यासाठी आलेल्या अलीमुद्दीन फजलोद्दीन (वय ५८, रा. रहीम नगर) यांच्या पोटावरही चाकूने वार केल्याचे तक्रारीत नमूद आहे. या तक्रारीवरून आरोपीविरुद्ध आर्म्स ॲक्टसह विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.तर दुसऱ्या फिर्यादीत विनोद बबन पोंगाणे (वय ५२) यांनी तक्रार दिली आहे की, फोनवर कोणाला शिव्या देतोस असे म्हणत कॉलर पकडून गचांडी देऊन लोखंडी रॉडने मारहाण करण्यात आली. या तक्रारीवरून पोलिसांनी शेख इसराईल शेख मेहमूद (वय ५३) व अलीमुद्दीन फजलोद्दीन (वय ५८) दोन्ही रा. रहीमनगर यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.या घटनेचा पुढील तपास उमरखेड पोलीस करीत आहेत.

# नांदेड जिल्ह्यास तीन दिवस येलो अलर्ट

नांदेड/प्रतिनिधी-प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, मुंबई यांनी दिलेल्या सूचनेनुसार नांदेड जिल्ह्यासाठी दि. २३ ते २६ सप्टेंबर या कालावधीत येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. या कालावधीत जिल्ह्यात तुरळक ठिकाणी वादळी वाऱ्यासह विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता असून, नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.दि. २३ व २४ सप्टेंबर रोजी जिल्ह्यात तुरळक ठिकाणी ताशी ४० ते ५० किलोमीटर वेगाने वादळी वारे वाहण्याची तसेच विजांच्या कडकडाटासह व ढगांच्या गडगडाटासह मुसळधार पावसाची शक्यता आहे. दि. २५ रोजी तुरळक ठिकाणी ताशी ४० ते ५० किलोमीटर वेगाने वादळी वारे, विजांचा कडकडाट व ढगांचा गडगडाट यासह हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस होण्याची शक्यता आहे. दि. २६ रोजी भूपृष्ठाजवळून अचानक ताशी ४० ते ५० किलोमीटर वेगाने वादळी किंवा वेगवान वारे वाहण्याची तसेच हलका पाऊस होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.वादळी वाऱ्यामुळे झाडांच्या फांद्या तुटणे, जुनी व कमकुवत झाडे उन्मळून पडणे, कच्च्या घरांचे किंवा शेडचे पत्रे उडणे तसेच हलक्या वस्तू हवेत उडण्याच्या घटना घडू शकतात. त्यामुळे नागरिकांनी तसेच सर्व संबंधित यंत्रणांनी आवश्यक ती खबरदारी घ्यावी.

# कंधार-लोहा तालुका कोरडा दुष्काळ जाहीर करण्याच्या मागणीसाठी काँग्रेसचे घंटानाद आंदोलन

कंधार/प्रतिनिधी-कंधार-लोहा तालुक्यात पावसा अभावी निर्माण झालेली परिस्थिती लक्षात घेता दोन्ही तालुके कोरडा दुष्काळग्रस्त जाहीर करावेत, शेतकऱ्यांना एकरी ५० हजार रुपयांचे तातडीचे अनुदान द्यावे, तसेच सरसकट १०० टक्के पीकविमा मंजूर करावा, यासह दुष्काळाच्या इतर उपाययोजना तातडीने राबवाव्यात, या मागणीसाठी कंधार तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने तहसील कार्यालय कंधार येथे घंटानाद आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनानंतर कंधारचे उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले. पावसाच्या अनिश्चिततेमुळे खरीप हंगामातील पिकांचे नुकसान होत असल्याने शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदतीची गरज असल्याचे काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी निवेदनाद्वारे प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले. कंधार-लोहा तालुक्यातील शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासनाने परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली. कोरडा दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना एकरी ५० हजार रुपये अनुदान द्यावे, सरसकट १०० टक्के पीकविमा मंजूर करावा आणि दुष्काळाशी संबंधित इतर आवश्यक उपाययोजना तातडीने लागू कराव्यात, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली. दरम्यान, राज्यातील विविध भागांतही पावसाच्या खंडामुळे दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाल्याच्या पार्श्वभूमीवर शेतकरी मदत, दुष्काळ जाहीर करणे आणि पीकविमा यांसारख्या मागण्यांसाठी आंदोलने होत आहेत. आंदोलनात कंधार तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष संजय भोसीकर, जिल्हा



सरचिटणीस डॉ. राजेश गुट्टे, माजी पं.स. सदस्य माधवराव गित्ते, बसवेश्वरराव मंगनाळे, रमेशसिंह ठाकूर, सुरेश कल्लाळीकर, त्र्यंबक पाटील लाडकेकर, के. पी. नवघरे, सचिन बसवंते, शिवम पाटील कुरुळेकर, रामकिशन रेड्डी, मोहनराव कांबळे, आनंदराव गित्ते, राजू गंदलवाड, विवेक पाटील चिवडे, इम्रान पठाण, सोमेश्वर देवपुजे आदींसह काँग्रेस पदाधिकारी, कार्यकर्ते व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नगरसेवकाच्या वाहनाखाली चिरडून दीड वर्षाच्या चिमुकल्याचा मृत्यू

कंधार/प्रतिनिधी-कंधार शहरातील प्रभाग क्र.६ मधील हातीपुरा परिसरात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नगरसेवकाच्या वाहनाखाली येऊन दीड वर्षाच्या चिमुकल्याचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना मंगळवारी दुपारी घडली. या घटनेनंतर परिसरात हळहळ व्यक्त होत असून, सायंकाळी कंधार पोलीस ठाण्यात सुमारे दोन तास तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

हातीपुरा येथील कोयल माधवराव ढवळे यांचा दीड वर्षाचा मुलगा रस्त्याच्या कडेला बसला होता. याचवेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या एका नगरसेवकाचे वाहन तेथून जात असताना चिमुकला वाहनाखाली आल्याचे सांगण्यात येत आहे. या दुर्घटनेत मुलाचा जागीच मृत्यू झाल्याची माहिती आहे. अपघातानंतर नगरसेवकाने चिमुकल्याला तातडीने कंधार ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. मात्र, वैद्यकीय तपासणीनंतर त्याचा मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले. घटनेची माहिती मिळताच ग्रामीण रुग्णालयात नातेवाईक व नागरिकांची मोठी गर्दी झाली. दरम्यान, मृत मुलाच्या आई-वडिलांनी संबंधित नगरसेवकाविरुद्ध कारवाईची मागणी करत पोलिसांकडे तक्रार दिल्याचे सांगण्यात येत आहे. या प्रकरणात गुन्हा दाखल करण्याची मागणी नातेवाईकांकडून करण्यात आली. तसेच भारतीय न्याय संहितेतील गंभीर कलमांसह ॲट्रॉसिटी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात आल्याची माहिती आहे. सायंकाळी सुमारे आठ वाजण्याच्या सुमारास मृत चिमुकल्याचा मृतदेह पोलीस ठाण्यात आणल्याने काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले. नातेवाईकांनी संबंधितांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी केल्याने पोलीस ठाण्यात मोठी गर्दी झाली होती. दरम्यान, पोलिसांनी या प्रकरणी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

# साहिल वाकोडे मृत्यूप्रकरणी उच्चस्तरीय चौकशी समिती स्थापन

मुंबई/प्रतिनिधी-आयआयटी मुंबईच्या पवई कॅम्पसमध्ये बी.टेक.च्या द्वितीय वर्षात शिक्षण घेणाऱ्या साहिल वाकोडे यांच्या मृत्यूप्रकरणी संस्थेच्या नियामक मंडळाने दहा सदस्यीय उच्चस्तरीय चौकशी समिती स्थापन केली आहे. परीक्षा हॉलमधील घटना, त्यानंतर घडलेल्या घडामोडी आणि मृत्यूच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेले प्रश्न यांची चौकशी समिती करणार असून, आठवडाभरात अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या प्रकरणात आरोप होत असलेले प्रा. सूर्यनारायण डुल्ला यांना रजेवर पाठविण्यात आले आहे. चौकशी पूर्ण होण्यापूर्वी कोणताही अंतिम निष्कर्ष काढला जाणार नसल्याचे संस्थेने स्पष्ट केले आहे.समितीचे अध्यक्ष आयआयटी पालक्कडच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष प्रा. रमेश वेंकटेश्वरन आहेत. समितीत आयआयटी मुंबईतील प्राध्यापक, प्रशासकीय अधिकारी, विद्यार्थी प्रतिनिधी, माजी दक्षता अधिकारी आणि मानसोपचारतज्ज्ञांचा समावेश आहे.

# एमपीजेकडून २७ सप्टेंबरला मार्गदर्शन कार्यक्रम


नांदेड/प्रतिनिधी-बाल संगोपन योजना, अकाल महिला योजना आणि संजय गांधी निराधार योजना यांसह विविध शासकीय कल्याणकारी योजनांचा लाभ गरजू नागरिकांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने मूव्हमेंट फॉर पीस अँड जस्टिस (एमपीजे) यांच्या वतीने माहिती व मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.



शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी पात्रता, आवश्यक कागदपत्रे, अर्ज करण्याची पद्धत तसेच योजनांमधून मिळणाऱ्या सुविधांची माहिती अनेक नागरिकांना उपलब्ध नसते. ही माहिती थेट गरजू नागरिकांपर्यंत पोहोचावी, या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.कार्यक्रमात महिला विकास व कल्याण विभागाचे अधिकारी श्री. इरफान शेख उपस्थित राहून विविध योजनांबाबत मार्गदर्शन करणार आहेत. विशेषतः महिला, बालक, निराधार व्यक्ती तसेच अन्य पात्र लाभार्थ्यांना योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक माहिती देण्यात येणार आहे.हा मार्गदर्शन कार्यक्रम रविवार, २७ सप्टेंबर रोजी दुपारी २ वाजता हैदर बाग क्रमांक १, गल्ली क्र.२,कार्यालय ईशातो अखलाखीयात, नांदेड येथे आयोजित करण्यात आला आहे. परिसरातील गरजू नागरिकांनी या कार्यक्रमास उपस्थित राहून शासकीय योजनांची माहिती घ्यावी आणि आपल्या संपर्कातील पात्र गरजू व्यक्तींनाही कार्यक्रमास आणावे, असे आवाहन एमपीजेच्या वतीने करण्यात आले आहे.

# माधवराव पाटील मुगावे यांचे दुःखद निधन

नायगाव/प्रतिनिधी-कंधार तालुक्यातील पेटवडज येथील ज्येष्ठ नागरिक माधवराव रामजी पाटील मुगावे (वय ७१) यांचे मंगळवारी दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने मुगावे कुटुंबीयांसह नातेवाईक, मित्रपरिवार आणि परिसरावर शोककळा पसरली.



माधवराव पाटील मुगावे हे मनमिळाऊ, प्रेमळ आणि आपुलकीने वागणारे व्यक्तिमत्त्व म्हणून परिचित होते. कोणाच्याही सुख-दुःखात सहभागी होणे, अडचणीच्या प्रसंगी मदतीसाठी धावून जाणे आणि सर्वांशी जिव्हाळ्याचे संबंध ठेवणे हा त्यांच्या स्वभावाचा विशेष गुण होता. आपल्या साध्या, सरळ आणि आपुलकीच्या वागणुकीतून त्यांनी मोठा आप्तपरिवार जोडला होता. त्यांच्या निधनाने एक प्रेमळ, आधार देणारे आणि आपुलकीचे व्यक्तिमत्त्व हरपल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त करत भावपूर्ण आदरांजली वाहिली.ते ग्रामविकास अधिकारी श्रीनिवास पाटील मुगावे व निळकंठ पाटील मुगावे यांचे वडील, तर भाजपाचे नेते श्रावण पाटील भिलवंडे यांचे सासरे होत.त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर आज बुधवारी पेटवडज, ता. कंधार येथे शोकाकूल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.यावेळी माजी जि. प. सदस्य प्रविण पा.चिखलीकर, बालाजी बच्चेवार, श्रावण पाटील भिलवंडे, पत्रकार, ग्रामविकास अधिकारी, यांच्यासह पंचक्रोशीतील नागरिक, नातेवाईक, पाहुणे, मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पान १ वरुन

## शेतकऱ्यांना सरसकट नुकसान...

झाली आहे. अनेक भागांत सोयाबीन, कापूस आणि इतर खरीप पिकांवर पावसाअभावी परिणाम झाला आहे. दुष्काळग्रस्त भागातील नागरिकांना पिण्याचे पाणी आणि अन्नधान्य उपलब्ध करून देण्यासाठी शासनाकडून आवश्यक उपाययोजना करण्यात येतील, असे फडणवीस यांनी सांगितले. दुष्काळाच्या काळात नागरिकांना कोणत्याही प्रकारची अडचण निर्माण होऊ नये, यासाठी प्रशासनाला आवश्यक सूचना देण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर जलसंधारणाची कामे मोठ्या प्रमाणावर हाती घेण्यात येतील. त्याचबरोबर स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध करून देणाऱ्या कामांना गती देण्यात येईल, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. दुष्काळाच्या संकटातून शेतकरी आणि ग्रामीण नागरिकांना बाहेर काढण्यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.मुख्यमंत्र्यांच्या या घोषणेमुळे दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांच्या अपेक्षा वाढल्या असून, येत्या दोन दिवसांत दुष्काळ जाहीर झाल्यानंतर नुकसानभरपाई आणि अन्य मदतीची अंमलबजावणी कशा पद्धतीने केली जाते, याकडे आता शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

## महाराष्ट्र विधानसभा निवडणूक...

आहे. एका इंग्रजी वृत्तपत्राच्या अहवालानुसार निवडणूक आयुक्त संधू आणि जोशी यांनी नवीन मतदारांची नोंदणी आणि मतदारांच्या नोंदींबाबत काही निर्णयांना अनधिकृत आणि बेकायदेशीर असल्याचे म्हटल्याचा दावा करण्यात आला आहे. या वृत्तामुळे निवडणूक आयोगाच्या अंतर्गत निर्णयप्रक्रियेवरून विरोधकांकडून सरकारवर आणि आयोगावर टीका सुरू झाली आहे.


## जाहीर प्रगटन

नांदेड येथील ४ थे सह दिवाणी न्या.क.स्तर नांदेड
यांच्या न्यायालयात
समक्ष एम.आर.कायस्थ सह.दि.न्यायालय क.स्तर
किरकोळ अर्ज क्र.१४१३/२०२६

१.गौसीया बेगम भ्र.महोमद आरीफ वय ५६ वर्ष धंदा घरकाम मो.नं.९९६०१६६००३, २.महोमद जाहेद रशीद पि.महोमद आरीफ वय ३० वर्षे धंदा खाजगी नौकरी रा.दोघे घर क्र.७-३-१२९० रजा नगर इतवारा नांदेड ता.जि.नांदेड

विरुध्द

निल

दावा : बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट १८२७ च्या कलम २ व ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदाराने या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र अर्ज केला आहे. ज्याअर्थी अर्जदार मयत महोमद आरीफ पि.शेख इब्राहीम यांचे वारस आहेत. मयत महोमद आरीफ पि.शेख इब्राहीम यांचा मृत्यू दिनांक ०१/०८/२०२६ रोजी झाला.

अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदाराशिवाय कोणीही मयताचे वारस नाहीत. अर्जदार यांनी मान्यवर न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. तरी प्रस्तुत प्रकरणी अर्जदार यांच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो स्वतः न्यायालयात ३१/१०/२०२६ रोजी किंवा तत्पुर्वी नोंदवावा. मुदतीनंतर येणाऱ्या आक्षेपाचा विचार करण्यात येणार नाही व अर्जाची पुढील सुनावणी करण्यात येईल.

आज दिनांक २३/०९/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

स्वाक्षरित/-
**क.लिपीक**
४ थे सह दिवाणी न्यायालय,
क.स्तर,नांदेड

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
**स.अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व.स्तर,नांदेड



**CHANGE IN MY NAME**

I have Changed my name from **Pyar Mohmmed Shaikh to Pyar Mohammed Shaikh Jan Mohammed Shaikh**

Henceforth be know and referred to as
**Pyar Mohammed Shaikh Jan Mohammed Shaikh.**

for all purposes.
**Kindly issue passport on my new name.**

**-:Contract:-**
Address:- Plot No.10 Sameera Bag,
Waghi Road Post Vazirabad,
District: Nanded
State: Maharashtra.
PIN Code: 431601
**Contact no:-9890616544**


# भाजपच्या प्रभारींची नियुक्ती; तावडेंकडे उत्तर प्रदेशची धुरा

नवी दिल्ली:भारतीय जनता पक्षाने विविध राज्यांसाठी प्रभारी आणि सहप्रभाऱ्यांच्या नियुक्त्या जाहीर केल्या आहेत. महाराष्ट्रातील नेत्यांनाही महत्त्वाच्या जबाबदाऱ्या देण्यात आल्या आहेत. राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांच्याकडे उत्तर प्रदेशच्या प्रभारीपदाची जबाबदारी सोपविण्यात आली असून, राज्यसभा खासदार मेधा कुलकर्णी यांची सहप्रभारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उत्तर प्रदेशातील पक्षसंघटना मजबूत करण्याची जबाबदारी तावडे आणि कुलकर्णी यांच्यावर राहणार आहे.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४